मायबोलीचा
गोडवा,
आठवणींचा
खजिना आणि
थोडंसं हास्य
▶ पान २ वर

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १९८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि. १ मार्च २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## मुंबईत पोलिस भरती उमेदवारांची परवड

### अपुऱ्या सुविधांअभावी मुक्काम रस्त्यावरच



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२८, मुंबई :** मुंबई पोलिस दल, ज्यांच्या कर्तव्याची आणि कामगिरीची दखल राज्यातच नव्हे तर आपल्या देशासोबतच परदेशात देखील अभिमानाने घेतली जाते असे पोलिस दल. पण याच पोलिस दलात सामील होण्याचे स्वप्न उराशी बाळगून राज्यातील खेडोपाड्यातून मुंबईत आलेल्या हजारो तरुणांना मात्र नको नको त्या परिस्थितीचा सामना करावा लागत आहे.

दरम्यान या पार्श्वभूमीवर युवा काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी आक्रमक भूमिका घेत सरकारवर टीका केली आहे. त्यांनी थेट महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सवाल करत म्हटले आहे की, मोठमोठ्या होर्डिंग्ससाठी 'लाडक्या बहिणी' आणि 'लाडक्या भावासाठी' खर्च करण्यासाठी सरकारकडे निधी आहे; मात्र पोलीस भरतीसाठी आलेल्या विद्यार्थ्यांसाठी एक सभागृह किंवा तात्पुरती निवास व्यवस्था करण्यासाठी निधी का उपलब्ध होत नाही? युवा काँग्रेसने प्रशासनाने तात्काळ शाळा, महाविद्यालयांची सभागृहे किंवा क्रीडांगणे उपलब्ध करून द्यावीत, तसेच पाणी व स्वच्छतेची व्यवस्था करावी, अशी मागणी केली आहे. अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. दरम्यान, स्थानिक प्रशासनाकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नसून उमेदवारांच्या सोयीसाठी काय पावले उचलली जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

#### कुणी घर देतं का घर..?

असा प्रश्न विचारण्याची वेळ पोलीस भरती उमेदवारांवर आली आहे. शहरात सुरू असलेल्या पोलीस भरती प्रक्रियेसाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून हजारो तरुण–तरुणी मोठ्या आशेने मीरा–भाईंदरमध्ये दाखल झाले आहेत. मात्र, राहण्याची कोणतीही अधिकृत व्यवस्था नसल्याने अनेक उमेदवारांना उघड्यावर, रस्त्यावरच रात्र काढावी लागत असल्याचे चित्र शहरात दिसून येत आहे. रेल्वे स्थानके, बसस्थानके आणि मोकळ्या मैदानांवर उमेदवारांचा तळ पडलेला असून पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आणि सुरक्षित निवाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. दूरवरून आलेल्या उमेदवारांनी प्रशासनाने तात्पुरती निवास व्यवस्था करावी, अशी मागणी केली आहे.

## माथेरानमध्ये व्यापारी दाम्पत्याला बांधून दरोडा! तपास नवी दिल्लीपर्यंत

● ५.६० लाखांचा ऐवज हस्तगत ● २ आरोपींना अटक

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.२८, माथेरान (रायगड) :** माथेरान शहरातील शिवाजी रोड परिसरात घडलेल्या व्यापारी दाम्पत्याला बांधून ठेवत केलेल्या धाडसी दरोड्याचा तपास थेट नवी दिल्लीपर्यंत पोहोचला असून पोलिसांनी २ आरोपींना अटक करून सुमारे पाच लाख साठ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही माहिती जिल्हा पोलिस उपअधीक्षक राहुल गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

१६ जानेवारी रोजी रात्री साडेआठच्या सुमारास शिवाजी रोडवरील वन ट्री हिल पॉइंटजवळ असलेल्या 'कदम टी स्टॉल' येथे ही घटना घडली होती. दुकानमालक नारायण मारुती कदम आणि त्यांची पत्नी चंदा कदम हे दुकानालगतच वास्तव्यास आहेत. रात्री दुकान बंद करण्याच्या तयारीत असताना चार अज्ञात इसम सिगारेट खरेदीच्या बहाण्याने दुकानात शिरले. त्यांनी चाकू–सुऱ्याचा धाक दाखवत दाम्पत्याला दोराने बांधून ठेवले आणि घरात शोधाशोध सुरू केली.या दरम्यान आरोपींनी सुमारे एक लाख रुपये रोख रक्कम तसेच सात ते आठ तोळे सोन्याचे दागिने असा एकूण सुमारे ५.६० लाखांचा ऐवज लंपास केला आणि फरार झाले. घटनेनंतर माथेरान पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.



गुन्ह्याचा कोणताही ठोस सुगावा नसताना माथेरान पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे तपासाची सूत्रे हलवली. या तपासात कर्जत व नेरळ पोलिस ठाण्यांच्या पथकांचीही मदत घेण्यात आली. तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपी पुष्पेंद्र राम धुलारी याला नवी दिल्ली येथील त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेण्यात आले. पुढील चौकशीत वसीम मोहम्मद मेवाती, शिवम बालवीर सिंग आणि बली मोहम्मद मेवाती (अलिगड, उत्तर प्रदेश) यांची नावे निष्पन्न झाली. त्यानुसार उत्तर प्रदेशातून दुसऱ्या आरोपीला अटक करण्यात आली.या कारवाईत माथेरान पोलिस ठाण्याच्या सहाय्यक पोलिस निरीक्षक सरिता मुसळे, कर्जतचे पोलिस उपनिरीक्षक सुशांत वरक, नेरळचे आशू बेंद्रे, राजाभाऊ केकान तसेच माथेरानचे दामोदर खतेले आदी अधिकाऱ्यांचा सहभाग होता.

## सिडकोच्या १६,८७६ घरांच्या योजनेस १९ मार्चपर्यंत मुदतवाढ

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२८, नवी मुंबई :** सिडको महामंडळातर्फे राबविण्यात येत असलेल्या १६.८७६ सदनिकांच्या माझे पसंतीचे सिडकोचे घर माझा फर्स्ट चॉइस नवी मुंबईमध्ये गृहनिर्माण योजनेत पर्याय निवडीसाठी दि.१९ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. योजनेस नागरिकांकडून मिळत असलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाचा विचार करून तसेच अधिकाधिक सर्वसामान्य नागरिकांना हक्काच्या घराचे स्वप्न साकार करण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी ही मुदतवाढ देण्यात आली आहे.

माझे पसंतीचे सिडकोचे घर माझा फर्स्ट चॉइस नवी मुंबईमध्ये या योजनेंतर्गत नवी मुंबईतील वाशी, बामणडोंगरी, खारकोपर, खारघर, तळोजा, मानसरोवर, खांदेश्वर, पनवेल आणि कळंबोली या नोडमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) व अल्प उत्पन्न गट (एलआयजी) यांच्यासाठी १६.८७६ सदनिका उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या सान्निध्यात उभारण्यात येत असलेल्या या गृहसंकुलांना रेल्वे, महामार्ग आणि मेट्रोद्वारे उत्कृष्ट कनेक्टिव्हिटी लाभली असून नागरिकांना सोयीस्कर व सक्षम शहरी जीवनशैलीची संधी उपलब्ध होणार आहे.

या योजनेत सहभागी होण्यासाठीची व आपले पसंतीचे पर्याय निवडण्यासाठीची अंतिम तारीख १९ मार्च २०२६ आहे. सदर योजनेत सहभागी होण्यासाठी इच्छुक नागरिकांनी अर्ज नोंदणीसाठी www.cidcohomes.com या अधिकृत संकेतस्थळास भेट द्यावी. योजनेसंदर्भातील सर्व अधिकृत व अद्ययावत माहिती सिडकोतर्फे प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या पत्रकांद्वारे तसेच सिडकोच्या अधिकृत समाजमाध्यमांवरून वेळोवेळी प्रसारित केली जाते. त्यामुळे नागरिकांनी योजनेविषयी इतरत्र उपलब्ध होणाऱ्या अप्रमाणित माहिती किंवा अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात येत आहे. अधिकाधिक नागरिकांनी दिलेल्या मुदतवाढीचा लाभ घेऊन योजनेसाठी अर्ज करावा आणि नवी मुंबईतील आपल्या हक्काच्या घराचे स्वप्न साकार करावे, असे सिडकोतर्फे आवाहन करण्यात आले आहे.

## विधानसभेच्या कामकाजाला गृहीत धरणे एम. देवेंद्र सिंग यांना पडले महागात

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, चंद्रपूर :** विधानसभेच्या कामकाजाला तसेच मंत्र्यांना गृहीत धरणे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव एम. देवेंद्र सिंग यांना महागात पडले असून २६ फेब्रुवारी रोजी विधानसभेत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने राज्य शासनाने एम. देवेंद्र सिंग यांना निलंबित केले आहे. सामान्य प्रशासन विभागाने २७ फेब्रुवारी रोजी तत्संबंधाने आदेश निर्गमित केला आहे. २६ फेब्रुवारी रोजी विधानसभेत राजुरा विधानसभेतील प्रदूषणाच्या प्रश्नावर अर्धा तास चर्चा झाली.

या चर्चेला उत्तर देताना पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांना ब्रिफींग साठी बोलावले असता त्यांनी स्पष्ट नकार दिला असे विधानसभागृहात सांगितले. ही बाब अतिशय गंभीर असल्याचे सांगत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी एम. देवेंद्र सिंग यांच्यावर कारवाईची मागणी केली. यावेळी तालिका सभापती दिलीप लांडे यांनी त्यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार आज २७ फेब्रुवारी रोजी त्यांच्या निलंबनाचा आदेश राज्य शासनाने निर्गमित केला आहे.

### » आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मांडला हक्कभंगाचा प्रस्ताव



दरम्यान आ. सुधीर मुनगंटीवार यांनी २७ फेब्रुवारी रोजी विधानसभेत एम देवेंद्र सिंग यांच्या विरोधात हक्कभंगाचा प्रस्ताव मांडला. यावेळी बोलताना सुधीर मुनगंटीवार म्हणाले, विधानसभागृह हे लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून जनतेच्या प्रश्नांचे निराकरण करण्यासाठीचे सर्वोच्च व सर्वभौम व्यासपीठ आहे. अशा पवित्र सभागृहात मांडण्यात आलेल्या लोक हिताच्या विषयावर उत्तर देण्यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी मंत्री महोदयांना ब्रिफिंगसाठी उपस्थित राहण्यास नकार देणे हा केवळ प्रशासनिक निष्काळजीपणा नसून विधानसभेच्या अधिकार व विशेषाधिकारांचा अवमान करणारी गंभीर बाब आहे. मंत्रीमहोदयांना विषयावरील संपूर्ण माहिती उपलब्ध करून देणे ही संबंधित अधिकाऱ्यांची वैधानिक व प्रशासकीय जबाबदारी आहे. त्या कर्तव्यात कसूर करून अप्रत्यक्षपणे विधानसभेच्या कार्यात अडथळा निर्माण करण्यात आला आहे. त्यामुळे ही कृती सभागृहाच्या विशेषाधिकारांचा भंग आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई होणे गरजेचे आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ चे सदस्य सचिव यांच्या विरुद्ध हक्कभंगाचा प्रस्ताव स्वीकारून हा विषय विशेषाधिकार समितीकडे पुढील चौकशी व कारवाईसाठी पाठवावा अशी मागणी आ. मुनगंटीवार यांनी केली. हे प्रकरण निश्चितपणे गंभीर असून या प्रकरणी शासनाची भूमिका जाणून घेत पुढील कारवाई करण्याचे आश्वासन विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिले.

## कांदा दरात मोठी घसरण!

### लासलगाव बाजार समितीत शेतकऱ्यांचे 'शोले' स्टाईल आंदोलन!

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२८, विंचूर (नाशिक) :** लासलगाव आशिया खंडातील कांद्याची प्रमुख बाजारपेठ असलेल्या लासलगाव बाजार समितीत गेल्या दोन दिवसांपासून कांद्याच्या भावात मोठी घसरण झाली आहे. यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी आणि ठाकरे गटाच्या शिवसैनिकांनी पाण्याच्या टाकीवर चढून 'शोले' स्टाईल आंदोलन केले. कांद्याचे भाव अचानक ५०० ते ६०० रुपयांपर्यंत खाली आल्याने बळीराजा हवालदिल झाला असून, सरकारने तातडीने हस्तक्षेप करावा अशी मागणी या आंदोलनाद्वारे करण्यात आली.

#### शेतकऱ्यांच्या मुख्य मागण्या :

✓कांद्याला किमान आधारभूत किंमत (MSP) जाहीर करावी.

✓बाजार समितीतील दराची घसरण थांबवण्यासाठी सरकारने तातडीने पावले उचलावीत.

✓कांदा उत्पादक शेतकऱ्यांना विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करावे.

लासलगाव बाजार समितीत गेल्या दोन दिवसांपासून कांद्याच्या दरात सातत्याने घसरण होत आहे. ५०० ते ६०० रुपये प्रतिक्विंटल इतका कमी भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघणे कठीण झाले आहे. या आर्थिक संकटामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट पसरली आहे.

**पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन**

शेतकऱ्यांच्या या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शिव सुरोशे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी आणि शेतकऱ्यांनी लासलगाव बाजार समिती परिसरातील पाण्याच्या टाकीवर चढून घोषणाबाजी केली. सरकारचे लक्ष वेधण्यासाठी हे धाडसी आंदोलन करण्यात आले. जोपर्यंत ठोस निर्णय होत नाही, तोपर्यंत खाली उतरणार नाही, अशी भूमिका आंदोलकांनी घेतल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.



कांदा पिकवण्यासाठी शेतकऱ्यांनी रात्रंदिवस घाम गाळला आहे. मात्र, बाजारात त्याला मातीमोल भाव मिळत असेल, तर शेतकऱ्याने जगायचे कसे? सरकारने झोपमोड करून याकडे तातडीने लक्ष दिले पाहिजे.

**– शिव सुरोशे, आंदोलक**

या आंदोलनामुळे बाजार समितीतील व्यवहार काही काळ विस्कळीत झाले होते. आता सरकार या आंदोलनाची दखल घेऊन शेतकऱ्यांना दिलासा देणार का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## आंतरराष्ट्रीय योगासन खेळाडू तुषार आवताडे यांची उपमहापौर देवकर यांना सदिच्छा भेट

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.२८, सोलापूर :** आंतरराष्ट्रीय योगासन खेळाडू तुषार आवताडे यांनी सोलापूरच्या उपमहापौर ज्ञानेश्वरी ताई देवकर यांची सदिच्छा भेट घेत त्यांचा सन्मान केला. या भेटीत शहरातील योगासन क्लासेस, त्यांचे वाढते महत्त्व आणि आजच्या धावपळीच्या जीवनात योगाची गरज याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली.

तुषार आवताडे यांनी सद्याच्या तणावपूर्ण जीवनशैलीत योगासनांचे शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी असलेले महत्त्व पटवून दिले. तसेच महापालिकेच्या माध्यमातून शहरात अधिकाधिक योग प्रशिक्षण शिबिरे, सार्वजनिक ठिकाणी योग सत्रे आणि युवकांसाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रम राबवता येतील का, यावर सकारात्मक चर्चा झाली.

उपमहापौर ज्ञानेश्वरी ताई देवकर या पर्यावरणाबाबत विशेष जागरूक असून सोलापूर शहरातील वाढते हवा प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, पाणी प्रदूषण, प्लास्टिक प्रदूषण आणि घनकचरा प्रदूषण या विषयांवर विशेष लक्ष देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. प्रदूषण कमी करण्यासाठी जनजागृती, वृक्षारोपण मोहिमा आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा प्रसार करण्यावर भर देण्यात यावा, असे मत व्यक्त करण्यात आले.

# मायबोलीचा गोडवा, आठवणींचा खजिना आणि थोडंसं हास्य





खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे
सकाळच्या प्रार्थनेत हे सूर घुमत असताना आम्ही मात्र शाळेच्या गेटबाहेर उभे! आत प्रार्थना आणि बाहेर आमच्यासाठी छडीची आरती , अशी आमची सकाळची 'कॉम्बिनेशन ऑफर '!

आज मराठी भाषा दिन निमित्ताने त्या साऱ्या आठवणी नकळत डोळ्यांसमोर उभ्या राहतात. शाळेची घंटा, मैदानातली धावपळ, प्रार्थनेतील सूर आणि मराठीच्या तासातील गोडवा , हे सगळं मनात अजूनही ताजं आहे.

मायबोलीची जादू

आज अनेक विद्यार्थी अभिमानाने सांगतात, आम्ही इंग्लिश मीडियमला शिकतोय, मराठी थोडी कच्ची आहे.

आमची ही मराठी कच्चीच होती; पण जी बोलायचो ती मनातून बोलायचो. ती मायबोली होती.

'आई' या शब्दातली ऊब 'मॉम' मध्ये कधी जाणवली नाही.

अ, आ, इ, ई शिकल्यानंतरच खऱ्या अर्थाने 'ढ' समजतो , तो ढ मराठीचा, भावना व्यक्त करण्याचा..!

मराठी भाषेचा गोडवा सांगताना संत ज्ञानेश्वर यांनीही आपल्या ओव्यातून मराठीचे महत्त्व अधोरेखित केले आहे. त्यांनी संस्कृतसारख्या दैवी भाषेचे ज्ञान मराठीत आणून सामान्य माणसापर्यंत पोहोचवले. हीच तर मराठीची ताकद लोकभाषा असूनही ज्ञानभाषा बनण्याची..!

आमची शाळा आणि त्या गोड आठवणी

मराठी शाळेत परीक्षा कमी आणि मजा जास्त..!

रँक म्हणजे काय, हे आम्हाला फारसं ठाऊक नव्हतं. निकालाची उत्सुकता नव्हती; पण सुट्टीची मात्र प्रचंड आवड!

शाळेच्या बाजूला बसणारी ती आजीबाई – कधी बोरे, कधी बठाणे, कधी चार आण्याची गोळी.

पैसे नसले तर उधारी! आणि कधी तिचा विसर पडला तर आमची उधारी बँक आपोआप माफ!

एक गोळी तीन तुकडे करून वाटून खाण्यात जी मजा होती, ती आजच्या महागड्या टिफिनमध्ये किंवा ब्रँडेड चॉकलेटमध्ये नाही.

मराठीचा तास -- शब्दांशी नातं जोडणारा

मराठीचा पेपर म्हणजे आमच्यासाठी उत्सवच..!

कवितेच्या ओळी लिहा म्हटलं की, शब्द आपोआप कागदावर उतरायचे.

समानार्थी, विरुद्धार्थी शब्द ते फक्त अभ्यासासाठी नव्हते; ते आमच्या भावनांशी जोडलेले होते.

पत्रलेखन, अर्ज, वृत्तांत, आणि सगळ्यात आवडता भाग निबंध!

मी पंतप्रधान झालो तर

मी मुख्यमंत्री झालो तर

त्या निबंधांत आम्ही स्वप्नं रंगवायचो. ते स्वप्न लिहिताना आम्ही खरोखर मोठे झाल्यासारखे वाटायचो.

बोलीभाषेचा अभिमान

वक्तृत्व स्पर्धेत आम्ही आमच्या मराठवाडा बोलीत बोलायचो.

हे बघलं असं म्हणायचो.

कोणी म्हणायचं, तो शब्द 'पाहिलं' असतो.

असू दे! त्या 'बघलं' शब्दामुळेच आमची ओळख निर्माण झाली..

मराठी भाषा फक्त शब्दांची नाही, ती माणसं जोडण्याची ताकद आहे. कोणाला कोणता शब्द भावेल सांगता येत नाही.

मराठी जिवंत कशी राहील?

एखादी भाषा जिवंत ठेवायची असेल तर ती मुखातून बोलली गेली पाहिजे,

कानांनी ऐकली गेली पाहिजे,

आणि सर्वात महत्त्वाचं मनातून जपली गेली पाहिजे.

आज मराठी बोलताना लाज वाटणारे काहीजण दिसतात ; पण आम्हाला कधीच लाज वाटली नाही. कारण ती आमची ओळख आहे, आमचा अभिमान आहे.

शेवटी

मराठी म्हणजे फक्त भाषा नाही, ती आठवणींचा खजिना आहे.

ती शाळेची घंटा आहे, ती चार आण्याची गोळी आहे, ती निबंधातील स्वप्नं आहेत, ती 'आई' शब्दातील ऊब आहे.

मराठी दिनाच्या निमित्ताने एवढंच म्हणावंसं वाटतं ,

एबीसीडी आली तरी चालेल; पण अ, आ, इ, ई विसरू नका!

कारण त्या अक्षरांतच आपली मुळं आहेत.

मराठी जपूया, मराठी बोलूया, मराठीचा अभिमान बाळगूया!



डॉ. नरेश बोधनकर
कुंडलवाडी, नांदेड

# होळी आणि धूलिवंदन : रंगांचा उत्सव की सामाजिक आत्मपरीक्षणाची संधी?

फाल्गुन महिन्याच्या पौर्णिमेला साजरा होणारा होळीचा सण हा केवळ रंगांचा उत्सव नाही, तर तो भारतीय संस्कृतीच्या अंत:करणातील आनंद, बंधुभाव आणि परिवर्तनाचा संदेश घेऊन येतो. दुसऱ्या दिवशी साजरे होणारे धूलिवंदन म्हणजे रंगांच्या उधळणीतून नात्यांना नवसंजीवनी देण्याचा दिवस असतो. गावोगावी पेटणाऱ्या होळीच्या ज्वाला आणि सकाळी उधळले जाणारे रंग यामागे एक सखोल तात्त्विक अर्थ दडलेला आहे, ते म्हणजे वाईट प्रवृत्तींचे दहन आणि चांगुलपणाचा स्वीकार.

होळीचा उगम पौराणिक कथांशी जोडलेला आहे. दैत्यराज हिरण्यकश्यपू आणि त्याची बहीण होलिका यांची कथा आपण लहानपणापासून ऐकत आलो आहोत. भक्त प्रल्हादाच्या निश्चयी श्रद्धेवर मात करण्यासाठी होलिकेने अग्नीत प्रवेश केला; परंतु सत्य, श्रद्धा आणि भक्तीच्या बळावर प्रल्हाद वाचला आणि होलिका भस्मसात झाली. या कथेतून मिळणारा संदेश आजही तितकाच प्रभावी आहे. अहंकार, अन्याय आणि अत्याचाराचा अंत निश्चित असतो. परंतु प्रश्न असा आहे की, आपण केवळ होळी पेटवतो की खरोखरच आपल्या मनातील 'होलिका' जाळतो? आजच्या समाजात असूया, मत्सर, द्वेष, राजकीय स्वार्थ, धार्मिक ध्रुवीकरण यांसारख्या प्रवृत्ती वाढताना दिसतात. अशा वेळी होळी ही केवळ विधी न राहता आत्मपरीक्षणाची संधी ठरायला हवी.

धूलिवंदन म्हणजे रंगांचा खेळ. सकाळी अंगावर रंग उधळत आपण एकमेकांना बुरा न मानो होली है असे म्हणत हसतखेळत क्षमा मागतो, क्षमा देतो. समाजातील भेद, जात, धर्म, वर्ग, श्रीमंती–गरीबी क्षणभरासाठी का होईना, विरघळतात. रंगांचे वैशिष्ट्य असे की ते



प्रत्येकाला सारखेच रंगवतात. पांढरा कुर्ता असो वा महागडी साडी, रंग लागला की सगळे समान! आजच्या काळात ही समता टिकवणे अधिक महत्त्वाचे झाले आहे. सोशल मीडियाच्या आभासी जगात आपण 'लाईक्स' आणि 'फॉलोअर्स'च्या मोजपट्टीवर नाती मोजतो. प्रत्यक्ष भेटीगाठी कमी होत चालल्या आहेत. धूलिवंदन हा सण आपल्याला सांगतो माणसांमध्ये मिसळा, मनमोकळे हसा, जुने राग विसरा. अलीकडच्या काळात होळीच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर लाकूड जाळले जाते. रासायनिक रंगांचा वापर वाढतो. त्यामुळे पर्यावरणाचे नुकसान होते, त्वचेच्या तक्रारी वाढतात. सण साजरा करताना पर्यावरणाची काळजी घेणे ही देखील सामाजिक जबाबदारी आहे. शेतीप्रधान देशात फाल्गुन हा हंगाम संपण्याचा आणि नवीन पीक येण्याचा काळ आहे. होळी ही निसर्गाच्या चक्राशी जोडलेली परंपरा आहे. त्यामुळे पर्यावरणपूरक होळी, नैसर्गिक रंगांचा वापर आणि पाण्याची बचत हे आजचे 'नवे संस्कार' ठरायला हवेत.

महाराष्ट्रात धूलिवंदनानंतर रंगपंचमीही मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. नागपूर सारख्या शहरात तर मित्रपरिवार, कुटुंबीय आणि समाजातील विविध घटक एकत्र येऊन हा सण आनंदाने साजरा करतात. परंतु काही ठिकाणी रंगांच्या नावाखाली जबरदस्ती, मद्यपान, महिलांवर गैरवर्तन यासारखे प्रकारही घडतात. हे चित्र चिंताजनक आहे. सणांचा आत्मा हा आनंद आणि सन्मानात असतो; दडपशाहीत नाही. रंग लावला म्हणजे अधिकार मिळाला अशी मानसिकता बदलायला हवी. धूलिवंदन हे 'सन्मानाने रंगवणे' शिकवते, 'जबरदस्तीने रंग चोपडणे' नव्हे. भारतीय समाजजीवनात सणांचे राजकारणाशीही नाते आहे. काही वेळा सणांच्या माध्यमातून समाजात फूट पाडण्याचे प्रयत्न होतात. होळीचा खरा संदेश मात्र एकात्मतेचा आहे. विविधतेत एकता ही भारताची ताकद आहे. होळी आपल्याला सांगते मतभेद असू द्या, पण मनभेद नकोत.

आज देशासमोर बेरोजगारी, महागाई, शिक्षण–आरोग्याच्या समस्या, शेतकऱ्यांचे प्रश्न उभे आहेत. होळीच्या ज्वालेसमोर उभे राहून आपण या प्रश्नांवरही विचार करायला हवा. केवळ व्यक्तीगत राग–द्वेष जाळून चालणार नाही; समाजातील अन्याय, विषमता आणि भ्रष्टाचार यांनाही जाळण्याचा निर्धार हवा. इतिहासात होळीच्या उत्सवात स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर राहिला आहे. लोकगीते, फुगड्या, सामूहिक नृत्य यांतून स्त्रियांनी आपला आनंद व्यक्त केला.

आजच्या काळात स्त्री–पुरुष समानतेचा संदेशही या सणातून द्यायला हवा. महिलांना सुरक्षित आणि सन्मानाने सण साजरा करता यावा, ही समाजाची जबाबदारी आहे. होळीच्या निमित्ताने बाजारपेठा गजबजतात. रंग, पिचकाऱ्या, मिठाई, पारंपरिक पदार्थ या सर्वांमुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. गावरान पुरणपोळी, करंजी, गूळ–पोहे यांचा सुगंध घराघरांत दरवळतो. सण हा अर्थचक्रालाही गती देतो. मात्र, खर्चाच्या स्पर्धेत अडकून मूळ आनंद हरवू नये, याची जाणीव ठेवायला हवी.

होळी आणि धूलिवंदन हे नात्यांच्या पुनर्बांधणीचे दिवस आहेत. वर्षभरात गैरसमज होतात, कटुता वाढते. पण या सणाच्या निमित्ताने आपण एकमेकांना भेटतो, मिठी मारतो, रंगपंचमीच्या शुभेच्छा देतो आणि नवे वर्ष नव्या उत्साहाने सुरू करतो. ज्या समाजात संवाद थांबतो, तिथे तणाव वाढतो. होळीचा रंग म्हणजे संवादाची सुरुवात. धूलिवंदन म्हणजे अहंकाराची धूळ झटकून टाकणे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे अंतर्मनातील होळी. आपल्या मनात साठलेले राग, भीती, न्यूनगंड, असुरक्षितता या सर्वांना जाळणे आवश्यक आहे. होळीची ज्वाला आपल्याला धैर्य देते; धूलिवंदनाचा रंग आपल्याला आनंद देतो. आजच्या वेगवान, तणावपूर्ण जीवनात आपण आनंद साजरा करायलाही विसरलो आहोत. होळी हा सण सांगतो, जगणे म्हणजे केवळ स्पर्धा नव्हे, तर उत्सवही आहे.

होळी आणि धूलिवंदन हे केवळ परंपरा नाहीत; ते जीवनदृष्टी आहेत. अन्यायावर न्यायाचा विजय, द्वेषावर प्रेमाचा विजय, निराशेवर आशेचा विजय हा संदेश या सणात दडलेला आहे. यावर्षी होळी पेटवताना आपण केवळ लाकूड जाळू नये; आपल्या मनातील कटुता जाळू या. धूलिवंदन साजरे करताना केवळ रंग उधळू नये; प्रेम, सन्मान आणि समतेचे रंग उधळू या. रंगांच्या या सणात प्रत्येकाच्या आयुष्यात आनंदाची उधळण होवो, समाजात सौहार्द फुलो आणि आपल्या अंत:करणातील होलिका भस्मसात होवो, हीच अपेक्षा. सर्वांना होळी आणि धूलिवंदनाच्या हार्दिक शुभेच्छा!



- प्रविण बागडे
नागपूर
मो.९९२३६२०९१९

# पेरावे तसे उगवते

पेरावे तसे उगवते ही एक जुनी, पण तितकीच सत्य आणि प्रभावी मराठी म्हण आहे. या म्हणीचा अर्थ असा की आपण जसे कर्म करतो, तसेच फळ आपल्याला मिळते. शेतकरी जसे चांगले बी पेरतो, त्याला तसेच पीक मिळते; तसेच वाईट बी पेरल्यास पीकही खराबच येते. ही म्हण केवळ शेतीपुरती मर्यादित नसून, मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राशी निगडित आहे. मानवाचे जीवन हे त्याच्या कृतींवर अवलंबून असते. लहानपणापासून आपण जे संस्कार घेतो, जे विचार मनात रुजवतो आणि ज्या सवयी अंगीकारतो, त्याच आपल्या भविष्यात दिसून येतात. विद्यार्थी जर नियमित अभ्यास, शिस्त आणि मेहनत करतो, तर त्याला यश मिळते. उलट आळस, वेळेचा अपव्यय आणि दुर्लक्ष केल्यास अपयशाला सामोरे जावे लागते. म्हणजेच, शिक्षणाच्या क्षेत्रातही पेरावे तसेच उगवते. समाजजीवनात ही म्हण तितकीच लागू पडते. आजच्या स्पर्धात्मक युगात अनेक जण त्वरित यश मिळवण्यासाठी चुकीचे मार्ग स्वीकारतात. मात्र असे यश तात्पुरते असते. कारण चुकीच्या मार्गाने मिळवलेले फळ शेवटी दुःखच देते. प्रामाणिक मेहनत, संयम आणि योग्य मार्गाने केलेले प्रयत्नच दीर्घकाळ टिकणारे यश देतात. निसर्गाचा नियम अटळ आहे – जसे बी, तसे फळ. म्हणूनच, प्रत्येकाने आपल्या विचारांवर, शब्दांवर आणि कृतींवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. आज आपण जे पेरतो, तेच उद्या आपल्या आयुष्यात उगवणार आहे, याची जाणीव ठेवली तर जीवन अधिक सुंदर, यशस्वी आणि समाधानकारक होते. पेरावे तसे उगवते ही म्हण आपल्याला चांगले कर्म करण्याची, सकारात्मक विचार ठेवण्याची आणि जबाबदारीने वागण्याची शिकवण देते. कारण जीवनात मिळणारे प्रत्येक फळ हे आपल्या स्वतःच्या कर्माचेच प्रतिबिंब असते. तीन चोर होते. एकदा त्यांनी एका श्रीमंत माणसाचे खूप पैसे चोरले. ते पैसे त्यांनी एका पिशवीत कोंबले व ते जंगलात गेले. तेथे त्यांना खूप भूक लागली. त्या जंगलात त्यांना काहीही खायला मिळेना. म्हणून त्यांच्यातला एक चोर जवळच्या गावात सर्वांसाठी जेवण आणायला गेला. जेवण आणायला गेलेल्या त्या चोराला एक दुष्ट कल्पना सुचली. तो हॉटेलात जेवला. नंतर त्याने आपल्या साथीदारांसाठी अन्न विकत घेतले आणि त्यात जालिम विष कालवले. त्याने विचार केला की, ते दोघे हे विषारी अन्न खाऊन मरतील नि मग ते सगळे पैसे मला एकट्यालाच मिळतील.इकडे जंगलात असलेल्या दोन चोरांनीसुद्धा दुष्ट कल्पना आखली. जेवण आणायला गेलेला साथीदार परत आला की त्याला ठार मारायचे आणि सर्व पैसे दोघांत वाटून घ्यायचे त्यांनी ठरविले. त्या तीनही चोरांनी ठरल्याप्रमाणे आपापली अमानुष योजना अंमलात आणली. विषारी अन्न घेऊन आलेल्या चोरावर ते तुटून पडले आणि त्याला त्यांनी ठार मारले. नंतर ते दोघे जेवले. त्या अन्नात जालीम विष असल्यामुळे लवकरच ते दोघेही तडफडून मरण पावले.

## वाचक पत्र

# दोषांची होळी करूया !

प्रत्येक माणसांत जसे काहीनाकाही गुण असतात, तसे असंख्य दोषही असतात. या दोषांमुळे जीवनात अनेकदा अपयश पदरी पडते, अपमान सहन करावा लागतो, नात्यांमध्ये वितुष्ट निर्माण होते, अनेकदा आर्थिक हानीही सहन करावी लागते. हे दोष माणसाचे कट्टर वैरी असतात त्यामुळे फाल्गुन महिन्याच्या पौर्णिमेला म्हणजेच हुताशनी पौर्णिमेच्या दिवशी आपल्यातील दोष, अनिष्ट विचार होळीत टाकून ते नष्ट करावेत असे हिंदु धर्मशास्त्र सांगते. पुढे १५ दिवसांनी हिंदू नववर्षारंभ म्हणजेच गुढीपाडवा येतो. या दिवशी नवा संकल्प केला जातो. मात्र खरोखर अशाप्रकरे दोषांची होळी करता येते का ? आपल्यातील दोष होळीत जाळून एका दिवसांत नष्ट करता येतात का ? आपल्या प्रत्येकावर जन्मोजन्मीचे संस्कार असतात, या संस्कारांतूनच आपल्यांत गुणांची आणि दोषांची निर्मिती झालेली असते. आपल्यामध्ये कोणकोणते दोष आहेत हे प्रत्येकाला चांगलेच ठाऊक असते. होळीमध्ये जाळून असे सर्व दोष नष्ट जरी करता नाही आले, तरी या दिवशी आपल्यातील २ प्रबळ दोष नष्ट करण्याचा निश्चय तर आपण नक्कीच करू शकतो. हा निश्चय एकदा झाला कि पुढचे १५ दिवस आपल्या हातात असतात या १५ दिवसांत सर्व प्रयत्नांची शिकस्त करून ते नष्ट करण्याचा प्रयत्न करावा जेणेकरून पुढे येणाऱ्या नवीन वर्षात या दोषांमुळे आपली होणारी हानी टळेल. २ प्रबळ दोषांवर आपल्याला मात करता आल्याने मिळणारा नवीन वर्षाचा आनंद काही वेगळाच असेल, चला तर यंदा होळीला आपल्यातील किमान २ दोषांची होळी करण्याचा संकल्प करूया !

**– नरेश घरत, चेंबूर**

# केस सुटका..

कोर्टा मध्ये केसेस
कित्येक वर्षे रखडे
पडत राही तारखा
कायदेजाळे जखडे

आरोपी शिक्केबसे
बदनाम होई मुखडे
करीयर बाद अख्खे
स्वप्नांचेलाख तुकडे

होईंखर्चाचा चुराडा
कुणास सांगू दुखडे

कु प्रसिद्ध करायला
नाचू लागती माकडे

संशयीसावट दाटले
लक्तरे अब्रुचे कपडे
चोरट्या नजरा मागे
पाठीशी खेटे लफडे

दोषी अथवा निर्दोष
सापळ्यात रे सापडे
फिरतानाचारचौघांत
डोळ्यां लावी झापडे

भ्रम निरास झालेला
मजकोण करेवाकडे
एकदा भंगले आरसे
कसेसांधायचे तुकडे

शेवटीनिर्दोष सुटका
वाजले सनई चौघडे
इतिहास बदलू कसा
प्रश्न असंख्य हो खडे

**हेमंत मुसरीफ, पुणे.**
९७३०३०६९९६

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## ठाणे ते समृद्धी महामार्गातील वाहतूक कोंडी सुटणार



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२८, ठाणे :** नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावरून ठाणे-मुंबईच्या दिशेने येणाऱ्या प्रवाशांचा प्रवास आता सिग्नल मुक्त होणार असला, तरी त्यासाठी प्रवाशांना जादा पैसे मोजावे लागणार आहेत. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ठाणे (साकेत) ते आमणे या नव्या उन्नत मार्गावर १०० रुपये टोल आकारण्याचा प्रस्ताव मांडला आहे. विशेष म्हणजे, या शुल्कात दरवर्षी ५ टक्के वाढही सुचवण्यात आली आहे.वाढते शहरीकरण आणि भिवंडी मानकोली परिसरातील गोदामांमुळे होणारी अवजड वाहतूक लक्षात घेता, मुंबई-नाशिक महामार्गावरील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी हा प्रकल्प हाती घेण्यात आला असून साधारण ६,७४२ कोटी रुपये खर्च अपेक्षित असलेल्या या सहा पदरी मार्गाचे नियोजन करण्यात आले आहे. दरम्यान हा मार्ग ठाण्यातील आनंदनगर-साकेत उन्नत मार्गाला जोडला जाईल. राजनौली जंक्शन पर्यंत हा मार्ग उन्नत असेल. पुढे सोनाळे गावापासून उजवीकडे वळण घेऊन हा मार्ग करवली आणि आमणे गावाजवळ समृद्धी महामार्गाला जोडला जाईल.माध्यमांना दिलेल्या वृत्तानुसार, प्रकल्पाचा वाढता खर्च, जमिनीचे संपादन आणि बांधकामाची किंमत भरून काढण्यासाठी टोलचा पर्याय निवडण्यात आला आहे. सध्या समृद्धी महामार्गावरून आमणे पर्यंत येताना प्रवाशांना प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. ही कटकट दूर करण्यासाठी एमएमआरडीएने हा 'कनेक्टर' प्रस्तावित केला आहे.

# प्रदूषण नियंत्रणासह, पट्टे वाटप, मंदिर विकास, पुतळा उभारणी व पायाभूत कामांना गती द्या - आ. जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, चंद्रपूर :** मतदारसंघातील अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. हे प्रश्न केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्षात मार्गी लागले पाहिजेत. नागरिकांनी आपल्यावर विश्वास ठेवला आहे. त्यामुळे प्रशासनाने अधिक संवेदनशीलता आणि जबाबदारीने काम करणे आवश्यक आहे. बेलसनी येथील कोल वॉशरीच्या प्रदूषणामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मोबदला, श्री माता महाकाली मंदिराला ब दर्जा व मंदिर विकास, चैत्र नवरात्र यात्रेतील सोयीसुविधा, छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारणी, विपश्यना केंद्र, पट्टे वाटप तसेच पायाभूत सुविधांच्या कामांना गती द्यावी, अशा सूचना आ. किशोर जोरगेवार यांनी जिल्हाधिकाऱ्यांना केल्या. शुक्रवारी मतदारसंघातील विविध विषयांबाबत आमदारांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील वीस कलमी सभागृहात संबंधित विभागांची आढावा बैठक बोलावली होती. या बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., चंद्रपूर मनपा आयुक्त नरेश अकुनूरी, उपविभागीय अधिकारी विशालकुमार मेश्राम, तहसीलदार विजय पवार, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी तानाजी यादव, भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक भुमरेड्डी गिज्जेवार, कृषी अधीक्षक तोटावार, तालुका कृषी अधिकारी अनिकेत माने, चंद्रपूर मनपाचे उपायुक्त संदीप चिद्रावार, शेषराव टाले, शहर अभियंता रविंद्र हजारे, राज्य परिवहन बिभागाच्या विभाग नियंत्रक स्मिता सुतवणे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



यावेळी भाजपाचे जिल्हा संघटक महामंत्री नामदेव डाहुले, बेलसनीच्या सरपंच इंदिरा कोल्हे, उपसरपंच मंगेश लोढे, सदस्य गौरव गोहणे, अमोल मोहितकर, सुरज विधाते, किसान आघाडीचे शंकर विधाते, माता महाकाली मंदिराचे विश्वस्त मोहन महाकाले, महाकाली महोत्सव ट्रस्ट चे विश्वस्त श्याम धोपटे, बलराम डोडाणी, अजय जयस्वाल, मिलिंद गंपावार, तुषार सोम, सविता दंडारे, वंदना हातगावकर, प्रकाश देवतळे, दशरथसिंह ठाकूर, मनोज पाल, रवी गुरनुले, सुभाष कासनगोट्टूवार, शेखर शेट्टी, सायली येरणे, स्वप्नील डुकरे, नगरसेवक जितेश कुळमेथे, पुष्पा उराडे, सारिका संदूरकर, रॉबिन बिश्वास, नीतेश गवळे, भालचंद्र दानव, सरला कुळसंगे, ज्योती जीवने, अनुजा तायडे, आशा देशमुख, आशीष माशीरकर, रामकुमार आक्कापेल्ली, सुमित बेले, राकेश नाकाडे, राम जंगम, चंद्रशेखर देशमुख, सतीश तायडे आदींची उपस्थिती होती.

श्री माता महाकाली मंदिर परिसर विकासासंदर्भातील प्रस्तावातील त्रुटी तात्काळ दूर करून सुधारित प्रस्ताव शासनाकडे पाठवावा. यात्रेनिमित्त येणाऱ्या भाविकांना आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. नियोजनबद्ध विकास आराखडा तयार करून कामांना गती द्यावी, अशा सूचना त्यांनी दिल्या. पात्र लाभार्थ्यांना त्वरित पट्टे वितरित करावेत. 'लॉक' उल्लेख असलेल्या प्रकरणांची सखोल चौकशी करून त्रुटी दुरुस्त कराव्यात व नागरिकांना अनावश्यक त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी, असेही त्यानी सांगितले. बाबूपेठ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथे विपश्यना केंद्र उभारण्याच्या प्रस्तावावर तातडीने कार्यवाही करावी. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती अश्वारूढ पुतळा उभारणीचा विषय जनभावनेशी निगडित असल्याने निधीची तरतूद करावी आणि पोलिस विभागाची आवश्यक परवानगी घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले. घुग्घुस परिसरातील कोळसा धूळप्रदूषणाचा प्रश्न अत्यंत गंभीर असून नागरिकांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. बेलसनी येथील महामाया कोल वॉशरीच्या धुळामुळे शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांची नुकसान झाले, ३ महिन्यापासून गावकरी तक्रार करीत आहे परंतु कंपनी आणि प्रदूषण विभाग याकडे दुर्लक्ष करीत आहे. घुग्घुस नगरपरिषद क्षेत्रातील महसूल विभागाच्या जागेवर इनडोअर-आउटडोअर स्टेडियम उभारणी, ग्रामपंचायतींना 'रेव्हेन्यू व्हिलेज' दर्जा देणे, ईरई नदीवरील पूरसंरक्षण भिंत उभारणी तसेच सातबारा उताऱ्यांचे प्रॉपर्टी कार्डमध्ये रूपांतर या विषयांवर संबंधित विभागांनी तातडीने प्रस्ताव सादर करून कार्यवाही करावी, असे निर्देशही त्यांनी दिले. नागरिकांच्या प्रश्नांवर वेळेत निर्णय घेणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे, असेही ते यावेळी म्हणाले. बैठकीस संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## देवगाव येथे विहिरीत पडून तरुणाचा दुर्दैवी मृत्यू; परिसरात हळहळ



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२८, विंचूर (नाशिक) :** देवगाव येथील सचिन विठ्ठल बोचरे (वय २५) यांचा विहिरीत बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना दि.२६ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी सुमारे सहाच्या सुमारास घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, सचिन बोचरे हे त्यांच्या राहत्या घराजवळील विहिरीवर जनावरांसाठी पाणी काढत असताना त्यांचा पाय घसरून ते विहिरीत पडले. पाण्यात बुडाल्याने त्यांचा मृत्यू झाला. ही घटना समजताच गावात शोककळा पसरली. सचिन बोचरे हे अत्यंत मनमिळावू स्वभावाचे होते. कुटुंबाची परिस्थिती हलाखीची असूनही ते कष्टाळू व मदतीस तत्पर म्हणून ओळखले जात होते. त्यांच्या अकाली निधनामुळे गावकऱ्यांकडून तीव्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. सदर घटनेची माहिती पोलीस पाटील सुनील बोचरे यांनी पोलिसांना दिली. याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार संदीप शिंदे व औदुंबर मुरडनर करीत आहेत.

## बल्लारपूर वेकोलि खुल्या खाणी परिसरात नाल्यात अनोळखी मृतदेह आढळला

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, बल्लारपूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर शहरातील वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (वेकोली) च्या खुल्या माईन्स परिसरालगत असलेल्या नाल्यात एका अनोळखी इसमाचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. सदर मृतदेह पूर्णतः कुजलेल्या स्थितीत असून केवळ हाडे शिल्लक दिसत असल्याने मृत्यूला अंदाजे आठ ते दहा दिवस उलटल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. माहितीनुसार,

### हत्या की आत्महत्या चर्चांना उधाण ?

सायंकाळच्या सुमारास काही युवक वेकोली परिसरात गेले असता त्यांना नाल्यात एक मृतदेह पडलेला दिसला. त्यांनी तात्काळ याबाबत पोलिसांना माहिती दिली.

माहिती मिळताच बल्लारपूर पोलीस स्टेशन चे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालय, बल्लारपूर येथे हलविला. मृत इसमाचे वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे असून त्याने निळ्या रंगाची जर्किन व राखाडी रंगाची पॅन्ट परिधान केली होती. मात्र मृतदेहाची ओळख अद्याप पटलेली नाही. पोलिसांकडून परिसरातील बेपत्ता व्यक्तींच्या नोंदींची पडताळणी सुरू आहे.

विशेष म्हणजे, बल्लारपूर पोलीस ठाण्यात आतापर्यंत अशा वर्णनाच्या व्यक्तीची बेपत्ता नोंद नसल्याची प्राथमिक माहिती आहे. दरम्यान, हा प्रकार आत्महत्या आहे की हत्या करून पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह नाल्यात फेकण्यात आला, याबाबत विविध तर्कवितर्क लावले जात आहेत. वेकोली परिसरात चोरीच्या घटना घडल्या असल्याने संबंधित इसम चोरीच्या उद्देशाने आला होता का? आणि पळताना नाल्यात पडून मृत्यू झाला का, याचाही तपास पोलीस करीत आहेत.

तसेच वेकोली परिसरात बाहेर राज्यातील मजूर मोठ्या प्रमाणावर कामासाठी येत असल्याने मृत इसम त्यापैकी कोणी आहे का? याचाही शोध घेतला जात आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक बिपिन इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रेमशाह सयाम करीत आहे.

## राहुरी पोलिसांची धाडसी कारवाई

### कल्याण येथील दरोड्यातील तीन आरोपी पाठलाग करून जेरबंद




**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.२८, राहुरी (अहिल्यानगर) :** कल्याण येथील कोळसेवाडी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या दरोड्याच्या गुन्ह्यातील तीन फरार आरोपींना राहुरी पोलिसांनी नगर-शिर्डी महामार्गावर पाठलाग करून धाडसी कारवाईत जेरबंद केले. दि.२६ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास राहुरी पोलीस स्टेशन येथील पोलीस हवालदार शकूर सय्यद, पो. ना. प्रवीण अहिरे, पो. कॉ. नदीम शेख, पो. कॉ. प्रमोद ढाकणे व पो. कॉ. सचिन ताजने हे सरकारी वाहनाने शहरात पेट्रोलिंग करत असताना पो. कॉ. प्रमोद ढाकणे यांना कोळसेवाडी पोलीस स्टेशन येथील हवालदार विशाल वाघ यांचा दूरध्वनी आला.

कोळसेवाडी येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक १०३/२०२६, BNS कलम ३०९(४)(६), २०४ अन्वये दरोड्याचा गुन्हा दाखल असून त्यातील उमाशंकर हनुमान प्रसाद पांडे (वय ५१), शरद कुमार मोहन (वय ४६) व नरेश फत्तु शर्मा (वय ४५, सर्व रा.उल्हासनगर) हे आरोपी स्कार्पिओ (MH05-J0247) वाहनाने नगरवरून शिर्डीकडे जात असल्याची माहिती देण्यात आली.

माहिती मिळताच पोलीस निरीक्षक संजय ठेंगे व पोलीस उपनिरीक्षक गणेश वाघमारे यांना कळविण्यात आले. त्यांच्या सूचनेनुसार राहुरी कॉलेजजवळ नगर-शिर्डी महामार्गावर तात्काळ नाकाबंदी करण्यात आली. संशयित स्कार्पिओ वाहन येताना दिसताच पोलिसांनी थांबण्याचा इशारा केला; मात्र चालकाने पोलिसांचा संशय आल्याने वाहन भरधाव वेगाने पळवण्याचा प्रयत्न केला. यावेळी राहुरी पोलिसांनी तत्काळ पाठलाग करून वाहन अडवले व तिन्ही आरोपींना ताब्यात घेतले. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे व उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक संजय आर. ठेंगे यांच्या नेतृत्वात पार पडली असून राहुरी पोलिसांच्या तत्परतेबद्दल वरिष्ठ अधिकारी व नागरिकांकडून त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

## कुसळंबमध्ये तरुणावर जीवघेणा हल्ला

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.२८, बार्शी(सोलापूर) :** बार्शी तालुक्यातील कुसळंब येथे २४ वर्षीय तरुणावर लोखंडी रॉडने मारहाण करून पिस्टलमधून गोळीबार केल्याची धक्कादायक घटना गुरुवारी (दि. २६) सायंकाळी घडली. या प्रकरणी बार्शी पोलीस ठाणे येथे जिवे ठार मारण्याच्या प्रयत्नाप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

बाळासाहेब नंदकुमार उकिरडे (वय २४, रा. कुसळंब, ता. बार्शी, जि. सोलापूर) हे शेती व्यवसाय करत असून पोलीस भरतीची तयारी करत आहेत. घटनेच्या दिवशी त्यांचे आई-वडील उपचारासाठी बार्शी येथे गेले होते, तर भाऊ शेतात गेला होता. सायंकाळी सुमारे ४.४५ वाजण्याच्या सुमारास घरासमोर गोंधळ ऐकून उकिरडे बाहेर आले असता योगेश भास्कर मोरे (रा. कुसळंब, सध्या रा. पुणे) हा हातात लोखंडी रॉड घेऊन घरात शिरल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. माझ्या पत्नीला मेसेज का करतोस? असा जाब विचारत मोरे याने उकिरडे यांच्या डाव्या पायावर व हातावर लोखंडी रॉडने वार केल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्याच्यासोबत आलेल्या एका अनोळखी व्यक्तीनेही मारहाण केल्याचा आरोप आहे. जीव वाचवण्यासाठी उकिरडे पळत सुटले असता घराबाहेर उभ्या असलेल्या काळ्या रंगाच्या चारचाकी वाहनाजवळील व्यक्तीने त्यांच्या दिशेने दोन वेळा पिस्टलमधून गोळीबार केल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

# अश्रू नयनांनी केंद्र प्रमुख संजय गुंजारकर यांना निरोप

### ३० वर्षांच्या निस्वार्थ सेवेचा खापरखेडा केंद्रात गौरव

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२८, नागपूर :** माणूस पदावरून निवृत्त होतो पण त्याने केलेल्या कार्याची शिदोरी अन आयुष्यात जोडलेली माणसे कायम सोबत राहतात. खापरखेडा केंद्राचे केंद्र प्रमुख संजय गुंजारकर यांचा निरोप समारंभ कौटुंबिक जिव्हाळ्याचा व भावनांनी डबडबलेला सोहळा ठरला. ३० वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर केंद्र प्रमुख संजय गुंजारकर खापरखेडा केंद्रा अंतर्गत असलेल्या सर्व शिक्षक शिक्षकांच्या प्रमुख उपस्थितीत २७ फेब्रुवारी शुक्रवारला प्रकाशनगर वसाहतीत असलेल्या जि.प.उच्च प्राथमिक शाळा खापरखेडा येथे भावपूर्ण निरोप देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच मीनाक्षी तागडे होत्या तर प्रमुख अतिथी म्हणून गटविकास अधिकारी मनोजकुमार हिरुळकर, माजी जि.प. सदस्य प्रकाश खापरे, उपसभापती राहुल तिवारी, शाळा समिती अध्यक्ष राजकुमार




निकोसे, शिक्षण विस्तार अधिकारी प्रदीपकुमार जनबंधू, पुरुषोत्तम मुंडे, जितेंद्र ठाकरे, मुख्याध्यापिका वीणा पांडे, ग्रामपंचायत सदस्य हेमलता पानतावणे, निकिता रामटेके, मुख्याध्यापक अनिल भेदे, दिलीप कुर्वे, भलवतकर, भराडे, यांची उपस्थिती होती. यावेळी वानखेडे, गौतम, सत्कार मूर्ती संजय गुंजारकर, मालती गुंजारकर, हर्ष गुंजारकर, रिया गुंजारकर आदि उपस्थित होते.

यावेळी मंचावर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते केंद्र प्रमुख संजय गुंजारकर यांचा सपत्नीक शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी सत्काराला उत्तर देताना केंद्र प्रमुख संजय गुंजारकर भावूक झाले होते ते म्हणाले ३० वर्षांच्या या प्रवासात खापरखेडा केंद्रातील प्रत्येक शिक्षक, शिक्षिका आणि अधिकाऱ्यांनी मला जे प्रेम आणि सहकार्य दिले त्याबळावरच मी अनेक शैक्षणिक उपक्रम यशस्वीपणे राबवू शकलो हे केंद्र आणि येथील माणसे माझ्या स्मरणात कायम राहतील. याप्रसंगी मंचावर उपस्थित मान्यवरांनी भाषणात संजय गुंजारकर यांच्या शिस्तप्रिय आणि मार्गदर्शक स्वभावाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशांत भशारकर, सूत्रसंचालन सुरेखा कुळसंगे यांनी केले तर आभार वंदना आसोले यांनी मानले.

# पानसरे महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२८, कुंडलवाडी (नांदेड) :** शुक्रवार दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी अर्जापूर येथील पानसरे महाविद्यालय कवीवर्य कुसुमाग्रज अर्थात वि.वा. शिरवाडकर यांच्या जयंतीनिमित्त मराठी विभागाच्या वतीने 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मा.नंदन नांगरे (माजी शिक्षण संचालक, छत्रपती संभाजीनगर) तसेच प्रा.डॉ. प्रकाश मोगले (ज्येष्ठ साहित्यिक, नांदेड) यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम बी. बेलखेडे हे होते. तसेच उपप्राचार्य डॉ. गोविंद चौधरी, स्टाफ सेक्रेटरी प्रा. हनुमंत मटके, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक डॉ. शुद्धोधन गायकवाड हे उपस्थित होते. मराठी विभाग प्रमुख डॉ. सिद्धोधन कांबळे, मराठी विभागाचे प्रा.डॉ. नारायण शिवशेट्टे, प्रा.डॉ.गोपाळ चौधरी प्रा. शैलेश उल्लेवार हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करतांना मा.नंदन नांगरे यांनी आपल्या कविता संग्रहातील विविध कवितांचा आढावा घेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व भाषेचे महत्त्व समजावून सांगितले. मा.नंदन नांगरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा




ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले यांचे विचार व कार्याचे योगदान सांगितले आहेच. तसेच त्यांच्या साहित्याचे वाचन केले तरच ते आपल्याला प्रगल्भतेने विचार मांडण्यास प्रवृत्त करेल.

तसेच प्रा. डॉ.प्रकाश मोगले यांनी बहिणाबाई चौधरी, संत जनाबाई, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, कवी कुसुमाग्रजांच्या साहित्यातील विचारांची मांडणी केली आहे. संत साहित्य, मराठी साहित्य ,बोलीभाषा, कविता, नाटक, निबंध,ललित गद्य इत्यादी साहित्य लेखनातील मूल्यविचार विद्यार्थ्यांनी वाचनाने समजून घेतले पाहिजे. तसेच अध्यक्ष पदावरून बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बेलखेडे यांनी आपल्या भावना व विचार व्यक्त करण्यासाठी जी भाषा आपल्याला घडवते,वाढवते ती म्हणजेच मातृभाषा म्हणजेच मराठी त्या मराठी भाषेचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. सिद्धोधन कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ.नारायण शिवशेट्टे यांनी केले तर उपस्थित मान्यवरांचे आभार कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.डॉ. गोपाळ चौधरी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मराठी विभागातील सर्व प्राध्यापकांनी प्रयत्न केले. या कार्यक्रमास वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील अनेक विद्यार्थी, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

# राज्य ग्रामीण उपजीविका अभियानांतर्गत विविध बचत गटांना प्रोत्साहनपर कर्ज वाटप

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.२८, उदगीर (लातूर) :** उदगीर तालुक्यातील अतनूर येथील महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा अतनूरच्या वतीने एसआरएलएम म्हणजे राज्य ग्रामीण उपजीविका अभियान, जे भारतात राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान एनआरएलएम आता डे-एनआरएलएम अंमलात आणण्यासाठी जबाबदार असलेली राज्यस्तरीय संस्था आहे. गरीब कुटुंबांना बचत गटांमध्ये एसएचजीएस एकत्रित करून, आर्थिक समावेशन सुलभ करून, वेतन/स्वयंरोजगारासाठी कौशल्ये निर्माण करून आणि शाश्वत उपजीविकेला प्रोत्साहन देऊन ग्रामीण गरिबी कमी करण्याचे उद्दिष्ट आहे. याअंतर्गत बसवेश्वर महिला बचत गट अतनूर व गंगामाता महिला बचत गट अतनूर यांना प्रत्येकी ४ लाख रुपये प्रमाणे



एकूण ८ लाख रुपयांचे कर्ज कार्यतत्पर शाखाधिकारी महेश प्रकाशराव ढेकाळे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी बँक अधिकारी राहुल राजेंद्र चव्हाण, रोखपाल अक्षयकुमार बागडी, बँक कर्मचारी हाणमंत कापडे, शासननियुक्त ग्राहक संरक्षण परिषदेचे अशासकीय सदस्य बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर उपस्थित होते.

यावेळी शाखाधिकारी महेश ढेकळे म्हणाले की, एसआरएलएम चे प्रमुख पैलू आणि वापर उदाहरणे:

**अंमलबजावणी संस्था :** प्रत्येक राज्याची स्वतःची संस्था असते, जसे की महाराष्ट्रात एमएसआरएलएम, मध्य प्रदेशात एमपीएसआरएलएम किंवा आसाममध्ये एएसआरएलएम, जी राज्य, जिल्हा आणि ब्लॉक पातळीवर कार्यरत असतात. बचत गटांना प्रोत्साहन: सामाजिक आणि आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी ग्रामीण महिलांना बचत गटांमध्ये संघटित करणे, प्रत्येक गरीब घरातील किमान एका महिलेचा समावेश सुनिश्चित करणे.

**उपजीविकेसाठी आधार :** शेती, पशुधन आणि लघु व्यवसाय विकास यासारख्या शेती आणि बिगर-शेती उपजीविकेसाठी प्रशिक्षण प्रदान करणे. आर्थिक समावेश: कर्ज, तांत्रिक सहाय्य आणि विपणन सेवा सुलभतेने उपलब्ध होण्यासाठी बचत गटांना बँकांशी जोडणे.

**लक्ष्य गट लक्ष केंद्रित करणे :** विमुक्त आणि भटक्या जमातींसह असुरक्षित समुदायांना लक्ष्य करणे, ओळखणे आणि त्यांना पाठिंबा देणे. हा आहे. तसेच ग्रामीण भागातील गरिबांना हक्क, हक्क आणि सार्वजनिक सेवा मिळण्यासाठी सक्षम वातावरण निर्माण करण्यासाठी एसआरएलएम काम करतात.

# शंकरराव चव्हाण इंग्लिश शाळेत 'राष्ट्रीय विज्ञान दिन' साजरा

**▶ विज्ञान प्रदर्शनीत विद्यार्थ्यांनी सादर केले नाविन्यपूर्ण मॉडेल**

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२८, नागपूर :** नोबेल विजेते भारतीय शास्त्रज्ञ सी.व्ही.रमन यांच्या 'रमन इफेक्ट' या शोधाच्या स्मरणार्थ विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा या दृष्टीकोनातून प्रकाशनगर येथील शंकरराव चव्हाण इंग्लिश स्कूल, खापरखेडा येथे शनिवारी २८ फेब्रुवारीला 'राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे सचिव गणेश चिखले यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी शंकरराव चव्हाण विद्यालयाच्या मुख्याध्यापिका वीणा पांडे, सुनील जालंदर,




किशोर बक्सरिया, यामिनी घोरमाडे, मुख्याध्यापिका मोनाली सुरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

विज्ञान प्रदर्शनीत इयत्ता ६ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न मांडता त्याचे प्रात्यक्षिक उपयोगात रूपांतर करणारे मॉडेल्स तयार केले होते यात प्रामुख्याने विद्युत चुंबकीय प्रेरण, सोलर सिस्टम व सोलर प्लांट, वॉटर प्युरीफायर प्लांट, जलचक्र, प्रकाश संश्लेषण, जल विद्युत, इलेक्ट्रिकल वॉटर डिस्पेन्सर, हायड्रोलिक पॉवर ब्रिज, वीज निर्मितीचे विविध मॉडेल, विद्यार्थ्यांनी सादर केले होते. यावेळी विद्यार्थ्यां मध्ये उत्साह दिसून येत होता.

मुख्याध्यापिका वीणा पांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कोळशापासून वीज निर्मितीची प्रक्रिया आणि कचरा व्यवस्थापनाचे महत्त्व सविस्तरपणे पटवून दिले. तसेच डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम आणि मायकल फॅरेडे या सारख्या महान शास्त्रज्ञांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.

# स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही गाजदीपूर अंधारात

## महावितरणचे तात्काळ उपाययोजनेचे वचन व वीजपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२८, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्याच्या उत्तर भागातील वडगाव सावताळ येथील गाजदीपूर ही आदिवासी आणि दुर्गम लोकवस्ती आहे. स्वातंत्र्यानंतरही या भागात रस्ते, पाणी आणि वीज पुरवठा यासारख्या मूलभूत समस्या कायम आहेत. विशेषतः वीज पुरवठा अपुरा असल्याने शेतकरी आणि ग्रामस्थ हैराण आहेत. दिवसभरात फक्त चार तासच वीज उपलब्ध होते आणि तीही कमी दाबाची मिळते, ज्यामुळे शेती आणि दैनंदिन जीवनावर परिणाम होतो.

या समस्येचे निराकरण करण्यासाठी वडगाव सावताळ सेवा सोसायटीचे चेअरमन शिवाजी रोकडे यांनी पुढाकार घेतला. त्यांनी टाकळी ढोकेश्वर विभागातील महावितरणचे अधिकारी



देशमुख यांना थेट गाजदीपूर येथे घेऊन गेले. यावेळी अधिकाऱ्यांनी स्थानिक ग्रामस्थांसोबत सविस्तर चर्चा केली आणि वीज पुरवठ्यातील त्रुटी जाणून घेतल्या. चर्चेदरम्यान ग्रामस्थांनी वीजेच्या कमी वेळ आणि कमी दाबाच्या समस्येचा पाढा वाचला. उपस्थितांमध्ये चेअरमन शिवाजी रोकडे, सुभाष कारगळ, खंडू कोळेकर, महादू झिटे, उत्तम नर्हे, सागर करगळ, पाटीलबा सातकर, संतोष करगळ, दादाभाऊ नर्हे, संतोष सातकर, बाबासाहेब सातकर, छबू बर्डे, बाळू झिटे, गुलाब पवार, कर्मचारी संतोष बर्वे, अक्षय गावडे आदी होते.

महावितरणच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांनी सर्व समस्या ऐकून घेतल्या आणि गाजदीपूर येथील वीज पुरवठा तात्काळ सुधारण्यासाठी उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. २४ तास पूर्ण दाबाने वीज पुरवठा कसा उपलब्ध होईल, यासाठी पाठपुरावा करून प्रश्न मार्गी लावणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**गाजदीपूर ही आमच्या आदिवासी बांधवांची दुर्गम वस्ती आहे. स्वातंत्र्यानंतरही वीज, रस्ते आणि पाण्याच्या समस्या कायम आहेत. शेतकऱ्यांना दिवसातून फक्त ४ तास कमी दाबाची वीज मिळते. महावितरणच्या अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष घेऊन जाऊन समस्या दाखवली. ते लवकरच पूर्ण दाबाने वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी पावले उचलतील, असा विश्वास आहे. आम्ही सतत पाठपुरावा करू.**
**– शिवाजी रोकडे (चेअरमन : वडगाव सावताळ सेवा सोसायटी)**

# थोडक्यात

## डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे आज स्वच्छता अभियान

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२८, कल्याण (ठाणे) :** डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा यांच्या सौजन्याने डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या वाढदिवसाच्या स्मृती दिना निमित्त आज रविवार, दि.१ मार्च रोजी सकाळी ८ वा. कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते, गावे व सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता अभियान नियोजित केले आहे. हि स्वच्छता मोहिम स्वच्छ भारत अभियानाचे महाराष्ट्र राज्याचे महामहिम राज्यपालांनी नियुक्त केलेले स्वच्छतादूत डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा चे अध्यक्ष, पद्मश्री पुरस्कार सन्मानित डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी व डॉ. सचिन धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजित करण्यात आली आहे.या अभियानात कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील शासकिय अधिकारी, लोकप्रतिनिधी, समाजसेवक व नागरिक सहभागी होतील.

## महाकाली यात्रा नियोजनाबाबत महापौरांनी घेतला आढावा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, चंद्रपूर :** जिल्ह्याची आराध्य दैवत म्हणून ओळख असलेल्या माता महाकाली यात्रेला १९ मार्चपासून सुरुवात होणार आहे. यासंदर्भात करावयाच्या नियोजनाबाबत महापौर संगीता खांडेकर यांनी मनपा मुख्यालयात आढावा घेतला. त्याआधी त्यांनी प्रत्यक्ष यात्रा परिसरात जाऊन पाहणी केली. याप्रसंगी उपमहापौर प्रशांत दानव, आयुक्त अकुनूरी नरेश, उपायुक्त संदीप चिद्रवार, उपायुक्त शेषराव टाले, मुख्य लेखाधिकारी मनोज गोस्वामी, शहर अभियंता रवींद्र हजारे, सहायक आयुक्त अनिलकुमार घुले, उपअभियंता रवींद्र कळंबे, प्रगती भुरे तसेच मनपाचे सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

महापौर म्हणाल्या, गर्दी व्यवस्थापनासाठी योग्य नियोजन प्रशासनाने करावे. भाविकांचा प्रवेश आणि बाहेर जाण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करावी. पाणीपुरवठा विभागाने भाविकांना पिण्यासाठी पाण्याच्या टाक्या व पाण्याचे टँकर सज्ज ठेवावे. आरोग्य विभागाने नि:शुल्क प्रथमोपचार वैद्यकीय सेवा तसेच २४ तास रुग्णवाहिका व अग्निशमन सेवा उपलब्ध ठेवावी. विद्युत विभागाने संपूर्ण परिसरात विद्युत व्यवस्था उभारावी तसेच यात्रेवर लक्ष ठेवण्यास सीसीटीव्ही लावण्याचे काम करुन घ्यावे. शिक्षण विभागाने वादळ, वारा, पाऊस अशी नैसर्गिक आपत्ती ओढावल्यास नागरिकांना स्थलांतरित करण्याकरीता मनपाच्या शाळा व इतर ठिकाणे राखीव ठेवावी.

यात्रा मैदान येथे व मनपा स्वच्छता झोन इमारत अशा २ जागी नियंत्रण कक्ष स्थापन करावे. बांधकाम विभागाने काही दुरुस्तीची कामे असल्यास आत्ताच करुन परिसरातील रस्ते व्यवस्थित आहेत याची खात्री करुन घ्यावी. स्वच्छता विभागाने मंदिर व यात्रा परिसर नियमित स्वच्छ राहील याची काळजी घेयावी. भाविकांना वाहने ठेवण्यास वाहनतळाच्या जागा निश्चित करुन घ्या व तसे फलक वेळेत लागतील याची काळजी घ्या. यात्रेकरु महिलांसाठी हिरकणी कक्ष उभारावा तसेच कपडे बदलण्यासाठी व आंघोळीसाठी खोल्यांची व्यवस्था करण्याचेही निर्देश त्यांनी यावेळी दिले.

## आज चंद्रपूरात तेलुगु साहित्य, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, चंद्रपूर :** महाराष्ट्र राज्य तेलगू समाज फेडरेशन मुंबई, आनंदराव वाय. अंगलवार चंद्रपूर जिल्हा समन्वयक विदर्भ व महाराष्ट्र राज्य, तेलगू समाजाच्या वतीने एनडी हॉटेल बापटनगर, चंद्रपूर येथे १ मार्च रोजी तेलगू साहित्य, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाला खा. प्रतिभा धानोरकर, आ. सुधीर मुनगंटीवार, आ. किशोर जोरगेवार, आ. सुधाकर अडबाले, पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, मलिरेड्डी संजिवा रेड्डी क्षेत्रीय महाव्यवस्थापक वेस्टर्न कोलफिल्ड महाकाली कॉलरी, मनपा महापौर संगीता खांडेकर, प्रशांत दानव, उपमहापौर मनपा चंद्रपूर, मनपा आयुक्त अकुनूरी नरेश, राजेश अड्डूर कॉंग्रेस गटनेता मनपा चंद्रपूर, सचिन निंबाळकर संचालक महाराष्ट्र राज्य तेलगू व विविध साहित्य अकादमी आदी मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

चंद्रपूर, गडचिरोली व यवतमाळ जिल्ह्यातील तेलगू भाषिक विविध समाजातील नेते पदाधिकारी यांचे प्रमुख उपस्थितीत तेलगू साहित्यावर चर्चा करणारे निवडक साहित्यिक, शिक्षक, आणि सेवानिवृत्त शिक्षक, अधिकारी, साहित्य व सांस्कृतिक प्रेमी पी. शोभाराणी, ज्योती रमेश कोलीकोटा, सत्यवती मॅडम, राजमौली अनसुरी, आनंदराव वाय अंगलवार, हेमलता, कांता तिवारी, पदमीनी बोरा, कोसना शंकर, पि. वासुदेव, बशिर, व्यंकटेश्वर, शरीनिवास बुन्नवा, पि. जितेंद्र मुर्ली सेनगारपवार, राजसिध्दांत पसुला, सामाजिक नेते जगनबाबू गंजी, अशोक कांटे, चंद्रशेखर कोटेवार, किशोर पोतनवार, रामप्रसाद मसादे, रतन शिलावार, अरविंद गांगुलवार, प्रकाश मॅकलवार, वनिता लाटेलवार यांच्या उपस्थितीत सांस्कृतिक कार्यक्रम, श्रीचरण नृत्य अकादमी चंद्रपूर चे संचालक प्रशांत कनूलवार यांचे निर्देशनात गणेश वंदन व भरत नाट्यम सादरकर्ते ग्रुप श्रीचरण नृत्य अकादमीचे ग्रुप बतकम्मा सामुहिक नृत्य, बतकम्मा, गौरम्मा ग्रुपतर्फे, विदर्भ बेलदार मुनुरु कापू कापेवार तेलंगा समाज ग्रुप, चंद्रपूर, प्रमुख आरती अंकलवार व अर्पणा अंगलवार चमू, बोनालू नृत्य मेडला महालक्ष्मी ग्रुप सिरोंचा, संकरात्री, सांस्कृतिक नृत्य सिरोंचा ग्रुप, सांस्कृतिक नृत्य सिध्दार्थ तेलगू स्कूल स्टुडंट्स ग्रुप, राजुरा. ग्रुप प्रमुख पि. शोभाराणी चमू, बोनालू नृत्य तेलगू समाज महिला ग्रुप बल्लारपूर इत्यादींचे रंगारंग सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. तरी परिसरातील तेलगू साहित्यिक व सांस्कृतिक कलाकारांनी लाभ घेयावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य तेलगू साहित्य अकादमीचे सहसंचालक सहसंचालक सचिन निंबाळकर, जगनबाबू गंजी, अशोक कांटे, महाराष्ट्र राज्य तेलगू समाज फेडरेशन मुंबई, आनंदराव वाय अंगलवार चंद्रपूर जिल्हा समन्वयक विदर्भ व महाराष्ट्र राज्य, तेलगू समाज आणि संजय भिमनवार, रतन शिलावार, रवी पुरेड्डीवार, पि. शोभाराणी यांनी केले आहे.